जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

1 2 DEC 2025

महा न्यूज & व्ह्यूज

वामाक्षी BOUTIQUE
Hanuman Nagar, ITI-Pachgaon road,
Front of Nimit Corner Appartment, Kolhapur.
Mob - 9175089609

### भौतिकशास्त्र आंतरराष्ट्रीय परिषद

# दिवस दुसरा नवसंशोधकांनी नवा ज्ञानप्रवाह निर्माण करावा: डॉ. नानासाहेब थोरात

## जर्मनी, आयर्लंड, ऑस्ट्रेलिया आणि दक्षिण कोरियाच्या शास्त्रज्ञांनी उलगडली संशोधनाची नवी क्षितिजे

**कोल्हापूर, (महान्यूज अँड व्ह्यूज) :**

संशोधकांनी बहुआयामी ज्ञान संपादन करून विविध ज्ञानशाखांच्या संगमातून नवा ज्ञानप्रवाह निर्माण करण्यासाठी परिश्रम घेतले पाहिजेत, असे प्रतिपादन आयर्लंडच्या युनिव्हर्सिटी ऑफ लिमरिक येथील प्रख्यात शास्त्रज्ञ डॉ. नानासाहेब थोरात यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या भौतिकशास्त्र अधिविभागामध्ये सुरू असलेल्या ''५ व्या आंतरराष्ट्रीय परिषद: फिजिक्स ऑफ मटेरियल्स अँड मटेरियल्स बेस्ड डिव्हाइस फॅब्रिकेशन''मध्ये उपस्थित संशोधकांना मार्गदर्शन करताना ते बोलत होते. परिषदेच्या दुसऱ्या दिवशी जागतिक स्तरावरील संशोधकांनी उपस्थित राहून मार्गदर्शन केले आणि नवसंशोधनाच्या क्षितिजांचा उपस्थितांना परिचय करून दिला. आज विविध तांत्रिक सत्रांमध्ये जर्मनी, आयर्लंड, ऑस्ट्रेलिया आणि दक्षिण कोरिया येथील नामवंत शास्त्रज्ञांनी आरोग्य, ऊर्जा आणि प्रगत तंत्रज्ञान या विषयी अत्यंत महत्त्वपूर्ण स्वरुपाचे मार्गदर्शन केले.

आज पहिल्या सत्रात मुंबई विद्यापीठाचे डॉ. पी. बी. सरवदे आणि इंदूर येथील राजा रामण्णा सेंटर फॉर अॅडव्हान्स्ड टेक्नॉलॉजीचे शास्त्रज्ञ डॉ. पुष्पेन मंडल यांनी मार्गदर्शन



केले. अध्यक्षस्थानी शिवाजी विद्यापीठाचे डॉ. केशव राजपुरे होते. यावेळी भारतीय संशोधकांनी प्रगत साधनसामुग्री व उपकरणांचा वापर करून देशांतर्गत तंत्रज्ञान विकसित करण्याची आवश्यकता असल्याचे डॉ. मंडल यांनी सांगितले.

दुपारच्या सत्रात आयर्लंडच्या युनिव्हर्सिटी ऑफ लिमरिकचे डॉ. नानासाहेब थोरात आणि दक्षिण कोरियाच्या चोन्नम नॅशनल युनिव्हर्सिटीचे डॉ. मयूर गायकवाड यांनी बायो-मटेरियल्स आणि त्यांचे वैद्यकीय क्षेत्रातील उपयोजन याविषयी सविस्तर माहिती दिली.

अध्यक्षस्थानी डॉ. अण्णासाहेब मोहोळकर होते.

त्यानंतर जर्मनीतील कील युनिव्हर्सिटीचे डॉ. अमर पाटील, ऑस्ट्रेलियाच्या युनिव्हर्सिटी ऑफ न्यू साऊथ वेल्सचे डॉ. एम. पी. सूर्यवंशी आणि दक्षिण कोरियाच्या सुंगक्युकवान युनिव्हर्सिटीचे डॉ. रवींद्र बुलाखे यांनी सौर ऊर्जा आणि बॅटरी तंत्रज्ञानातील नवनवीन प्रवाहांची माहिती दिली. तसेच, जपानमधील हिरोशिमा विद्यापीठाचे डॉ. विनायक पारळे यांनी एरोजेल पदार्थांच्या आधुनिक उपयोजनाविषयी मार्गदर्शन केले. डॉ. हेमराज यादव अध्यक्षस्थानी होते. परदेशातील संशोधन संधी आणि आव्हाने याविषयीही या वक्त्यांनी मार्गदर्शन केले.

सायंकाळी विशेष सांस्कृतिक कार्यक्रमात महाराष्ट्राची लोककला आणि परंपरा दर्शविणारी नृत्ये व गायन सादरीकरण झाले.उद्या परिषदेच्या अखेरच्या दिवशी चिली (दक्षिण अमेरिका) येथील डॉ. संतोष नंदी, पुण्याच्या टॉरल इंडिया प्रा. लि.चे व्यवस्थापकीय संचालक आणि सीईओ भरत गीते हे संशोधन आणि उद्योग यावर मार्गदर्शन करतील. त्यानंतर परिषदेचा समारोप होईल.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

12 DEC 2025
तरुण भारत

# नवसंशोधकांनी नव्या ज्ञानप्रवाहाकडे वळावे

## डॉ. नानासाहेब थोरात : जर्मनी, आयर्लंड, ऑस्ट्रेलिया, कोरियाच्या शास्त्रज्ञांकडून मार्गदर्शन

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

संशोधकांनी बहुआयामी ज्ञान मिळवून विविध ज्ञानशाखांच्या संगमातून नवा ज्ञानप्रवाह निर्माण करण्यासाठी परिश्रम घ्यावेत, असे प्रतिपादन आयर्लंडच्या युनिव्हर्सिटी ऑफ लिमरिक येथील प्रख्यात शास्त्रज्ञ डॉ. नानासाहेब थोरात यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या भौतिकशास्त्र अधिविभागामध्ये सुरू असलेल्या 'पाचव्या आंतरराष्ट्रीय परिषद: फिजिक्स ऑफ मटेरियल्स अँड मटेरियल्स बेस्ड डिव्हाइस फॅब्रिकेशन"मध्ये परिषदेत ते बोलत होते.

परिषदेच्या दुसऱ्या दिवशी जागतिक स्तरावरील संशोधकांनी उपस्थित राहून मार्गदर्शन केले. विविध तांत्रिक सत्रांमध्ये जर्मनी, आयर्लंड, ऑस्ट्रेलिया आणि दक्षिण कोरिया येथील नामवंत शास्त्रज्ञांनी आरोग्य, ऊर्जा व प्रगत तंत्रज्ञानाविषयी स्वरुपाचे मार्गदर्शन केले.

गुरुवारी पहिल्या सत्रात मुंबई विद्यापीठाचे डॉ. पी. बी. सरवदे व इंदूर येथील राजा रामण्णा सेंटर फॉर अ‍ॅडव्हान्स्ड टेक्नॉलॉजीचे शास्त्रज्ञ डॉ. पुष्पेन मंडल यांनी मार्गदर्शन केले. अध्यक्षस्थानी शिवाजी विद्यापीठाचे डॉ. केशव राजपुरे होते. यावेळी भारतीय संशोधकांनी प्रगत साधनसामुग्री व उपकरणांचा वापर करून देशांतर्गत तंत्रज्ञान विकसित करण्याची आवश्यकता असल्याचे डॉ. मंडल यांनी सांगितले.



**कोल्हापूर : आंतरराष्ट्रीय परिषदेत मार्गदर्शन करताना प्रख्यात शास्त्रज्ञ डॉ. नानासाहेब थोरात.**

दुपारच्या सत्रात आयर्लंडच्या युनिव्हर्सिटी ऑफ लिमरिकचे डॉ. नानासाहेब थोरात आणि दक्षिण कोरियाच्या चोन्नम नॅशनल युनिव्हर्सिटीचे डॉ. मयूर गायकवाड यांनी 'बायो–मटेरियल्स' आणि त्यांचे वैद्यकीय क्षेत्रातील उपयोजन याविषयी सविस्तर माहिती दिली. अध्यक्षस्थानी डॉ. अण्णासाहेब मोहोळकर होते.

त्यानंतर जर्मनीतील कील युनिव्हर्सिटीचे डॉ. अमर पाटील, ऑस्ट्रेलियाच्या युनिव्हर्सिटी ऑफ न्यू साऊथ वेल्सचे डॉ. एम. पी. सूर्यवंशी आणि दक्षिण कोरियाच्या सुंगक्युकवान युनिव्हर्सिटीचे डॉ. रवींद्र बुलाखे यांनी सौर ऊर्जा आणि बॅटरी तंत्रज्ञानातील नवनवीन प्रवाहांची माहिती दिली. जपानमधील हिरोशिमा विद्यापीठाचे डॉ. विनायक पारळे यांनी एरोजेल पदार्थांच्या आधुनिक उपयोजनाविषयी मार्गदर्शन केले. डॉ. हेमराज यादव अध्यक्षस्थानी होते. सायंकाळी विशेष सांस्कृतिक कार्यक्रमात महाराष्ट्राची लोककला आणि परंपरा दर्शविणारी नृत्ये व गायन सादरीकरण झाले.

12 DEC 2025 पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# नवसंशोधकांनी नवा ज्ञानप्रवाह निर्माण करावा

## डॉ. नानासाहेब थोरात; भौतिकशास्त्र आंतरराष्ट्रीय परिषद

कोल्हापूर : प्रतिनिधी

संशोधकांनी बहुआयामी ज्ञान संपादन करून विविध ज्ञानशाखांच्या संगमातून नवा ज्ञानप्रवाह निर्माण करण्यासाठी परिश्रम घेतले पाहिजेत, असे प्रतिपादन आयर्लंडच्या युनिव्हर्सिटी ऑफ लिमरिक येथील शास्त्रज्ञ डॉ. नानासाहेब थोरात यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या भौतिकशास्त्र अधिविभागामध्ये सुरू असलेल्या पाचव्या आंतरराष्ट्रीय परिषद : फिजिक्स ऑफ मटेरियल्स अँड मटेरियल्स बेस्ड डिव्हाईस फॅब्रिकेशनमध्ये संशोधकांना मार्गदर्शन करताना ते बोलत होते. परिषदेच्या दुसऱ्या दिवशी जागतिक स्तरावरील संशोधकांनी उपस्थित राहून मार्गदर्शन केले आणि नवसंशोधनाच्या क्षितिजांचा उपस्थितांना परिचय करून दिला. विविध तांत्रिक सत्रांमध्ये जर्मनी, आयर्लंड, ऑस्ट्रेलिया आणि दक्षिण कोरिया येथील नामवंत शास्त्रज्ञांनी आरोग्य, ऊर्जा आणि प्रगत तंत्रज्ञान याविषयी मार्गदर्शन केले.

पहिल्या सत्रात मुंबई विद्यापीठाचे डॉ. पी. बी. सरवदे आणि इंदूर येथील राजा रामण्णा सेंटर फॉर ॲडव्हान्स्ड टेक्नॉलॉजीचे शास्त्रज्ञ डॉ. पुष्पेन मंडल यांनी मार्गदर्शन केले. अध्यक्षस्थानी शिवाजी विद्यापीठाचे डॉ. केशव राजपुरे होते.

दुपारच्या सत्रात आयर्लंडच्या युनिव्हर्सिटी ऑफ लिमरिकचे डॉ. थोरात आणि दक्षिण कोरियाच्या चोन्नम नॅशनल युनिव्हर्सिटीचे डॉ. मयूर गायकवाड यांनी 'बायो-मटेरियल्स' आणि त्यांचे वैद्यकीय क्षेत्रातील उपयोजन याविषयी सविस्तर माहिती दिली. अध्यक्षस्थानी डॉ. अण्णासाहेब मोहोळकर होते.

त्यानंतर जर्मनीतील कील युनिव्हर्सिटीचे डॉ. अमर पाटील, ऑस्ट्रेलियाच्या युनिव्हर्सिटी ऑफ न्यू साऊथ वेल्सचे डॉ. एम. पी. सूर्यवंशी आणि दक्षिण कोरियाच्या सुंगक्युकवान युनिव्हर्सिटीचे डॉ. रवींद्र बुलाखे यांनी सौरऊर्जा आणि बॅटरी तंत्रज्ञानातील नवनवीन प्रवाहांची माहिती दिली. जपानमधील हिरोशिमा विद्यापीठाचे डॉ. विनायक पारळे यांनी एरोजेल पदार्थांच्या आधुनिक उपयोजनाविषयी मार्गदर्शन केले. डॉ. हेमराज यादव अध्यक्षस्थानी होते. सायंकाळी सांस्कृतिक कार्यक्रमात महाराष्ट्राची लोककला आणि परंपरा दर्शवणारी नृत्ये व गायन सादरीकरण झाले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
12 DEC 2025
तरूण भारत

# संविधानाची मूलभूत संरचना समजून घेणे महत्वाचे

- डॉ. व्ही. एम. शिंदे
- भारतीय राज्यघटना मूलभूत संरचना सिद्धांताचा विकास" चर्चासत्राचा समारोप



कोल्हापूर : चर्चासत्रात बोलताना कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे सोबत डॉ. कृष्णा पाटील, डॉ. प्रकाश पवार, विनय शिंदे.

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

भारतीय संविधानाच्या आकलनासाठी मूलभूत संरचना समजून घेणे महत्त्वाचे असल्याचे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांनी केले.

शिवाजी विद्यापीठातील दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र, गांधी अभ्यास केंद्र आणि समाज कल्याण विभागाच्या संयुक्त विद्यमाने पीएम.उषा योजने अंतर्गत आयोजित 'भारतीय राज्यघटना: मूलभूत संरचना सिद्धांताचा विकास" या विषयावरील चर्चासत्रात ते बोलत होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मराठी अधिविभागाचे डॉ.रणधीर शिंदे होते. यावेळी संचालक डॉ. कृष्णा पाटील, समन्वयक डॉ. प्रकाश पवार व उपकुलसचिव विनय शिंदे यांची प्रमुख उपस्थिती होती. विद्यापीठाच्या संख्याशास्त्र अधिविभागाच्या सभागृहात चर्चासत्र झाले.

डॉ. शिंदे म्हणाले, संविधानातील सरनामा, धर्मनिरपेक्षतेचे तत्व हे सर्व भारतीय यांना एकत्र ठेवण्याचे काम करीत आहे. संविधानात सांगितलेले सरनामा, कल्याणकारी राज्य, मूलभूत हक्क आणि कर्तव्याची जाणीव, समानतेचे तत्व, न्यायालयीन प्रक्रिया, निवडणूक प्रक्रिया ही मुळापासून वाचली पाहिजे.

भारतीय संविधानाची तीन महत्त्वाची वैशिष्ट्ये आहेत. एक म्हणजे भारतीय संविधान हे जगातील सर्वात मोठे संविधान आहे. हे संविधान आम्ही तयार केले असून स्वत: प्रत अर्पण केले आहे. दोन निसर्गाचे संवर्धन करण्याचे तत्व भारतीय संविधानात सांगितले आहे. म्हणून हे संविधान फक्त भारताचे नव्हे तर जगाचे संविधान व्हावे. आणि तीन विज्ञाननिष्ठ आणि विवेकशील समाज निर्माण करणे या तत्वाचा ही समावेश भारतीय संविधानात केला आहे.

शारदाबाई पवार अध्यासन समन्वयक प्रा. डॉ. भारती पाटील म्हणाल्या की, राष्ट्रीय चळवळ, नेत्यांचे विचार व भारतीय सामाजिक स्थिती या सर्व गोष्टींचा प्रभाव भारतीय राज्यघटनेवर पडला आहे. अध्यक्षस्थानी मानव्यविद्या शाखा अधिष्ठाता प्रा.डॉ. एम. एस. देशमुख होते. प्रा. डॉ. प्रकाश पवार यांनी प्रास्ताविक केले. डॉ. सचिन भोसले यांनी परिचय करून दिला. संचालक डॉ. कृष्णा पाटील यांनी अहवाल वाचन केले. डॉ. नगीना माळी व प्रियांका सुर्वे यांनी सूत्रसंचालन केले. विनय शिंदे यांनी आभार मानले.

12 DEC 2025

जनप्रवास

# आर्थिकदृष्ट्या कमकुमत महाविद्यालयाला निधी देणार

**जनप्रवास : कोल्हापूर**

शिवाजी विद्यापीठ अधिसभेत प्रश्नोत्तराच्या तासात प्रश्नांची उत्तरे देणाऱ्यांची नावे अंतिम केली. तसेच आर्थिकदृष्ट्या कमकुमत महाविद्यालाला आर्थिक निधी देण्याच्या शिफारसीला मान्यता देण्यात आली. हा निर्णय शिवाजी विद्यापीठ व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत घेण्यात आला.



- **शिवाजी विद्यापीठ व्यवस्थापन परिषदेत निर्णय**

एका महाविद्यालयातील २२ विद्यार्थ्यांच्या हॉलतिकीटवर सही कोणाची होती या विषयावर चर्चा करण्यात आली. नियतकालिका स्पर्धेच्या निकालाला मान्यता देण्यात आली. शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी, अधिकाऱ्यांना गंभीर आजाराबाबात देण्यात येणारे दीड लाख रूपये देण्यासाठी समिती गठीत केली. खरेदी समितीच्या वृत्तांताला मान्यता दिली. नॅनोसायन्स अधिविभाग प्रमुखाला संचालक पद बहाल करण्यास मान्यता. चेंजिंग इन स्टाफला मान्यता देण्यात आली. थुकरेवाडी येथील विनाअनुदानित बीएड कॉलेजला सेवानिवृत्त सदस्य प्राचार्य म्हणून नेमण्यास मान्यता दिली. तसेच आयत्यावेळच्या विषयात स्वावलंबन भारत अभियान व शिवाजी विद्यापीठ दरम्यान सामंजस्य कराराला मान्यता. सिनेट सदस्य काव्यश्री नलवडे यांच्या प्रयत्नातून टॅलीबाबतच्या प्रस्तावाची सद्यस्थिती व आगामी धोरण यावर चर्चा झाली. तसेच अधिसभेत बजेट मांडण्यासाठी डॉ. रघुनाथ ढमकले यांची नियुक्ती केली. बीव्होक अभ्यासक्रमाचे एक वर्ष पूर्ण केलेल्या विद्यार्थ्यांना शिवाजी विद्यापीठाचा शिक्का, सही असलेले सर्टिफिकेट द्या, या विषायावर चर्चा करून मान्यता देण्यात आली.

12 DEC 2025

सकाळ

# 'बी. व्होक'च्या विद्यार्थ्यांना मिळणार विद्यापीठाचे प्रमाणपत्र

**कोल्हापूर :** बी. व्होक अभ्यासक्रमाचे एक वर्ष पूर्ण केलेल्या विद्यार्थ्यांना शिवाजी विद्यापीठाचे प्रमाणपत्र मिळणार आहे. आर्थिकदृष्ट्या कमकुवत महाविद्यालयांना निधी दिला जाणार आहे. त्याबाबतचे प्रस्ताव विद्यापीठ व्यवस्थापन परिषदेने आज मान्यता दिली. या व्यवस्थापन परिषदेची बैठक प्रभारी कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी यांच्या अध्यक्षतेखाली झाली. यावेळी प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव उपस्थित होते. महाविद्यालयातील वाढीव तुकड्यांचे प्रस्ताव निकष तपासून मंजूर करण्यास मान्यता देण्यात आली. चेंजिंग इन स्टाफला व 'यूडीआरएफ' पॉलिसीचा मसुदा मान्य केला गेला. शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी, अधिकाऱ्यांना गंभीर आजाराबाबात देण्यात येणारे दीड लाख रुपये देण्याबाबत समिती गठीत केली.